**प्रेसनोट दि.१८/०७/२०१९**

## मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.

### पोलीस ठाणे हद्दीतील रिक्षा संघटना व चालक/मालक यांची बैठक घेवून जनजागृती करण्यात आली.

दि.१७/०७/२०१९ रोजी मुंढवा पोलीस ठाणे हद्दीतील बी.टी.कवडे रोड, घोरपडी येथील रिक्षा चालक मालक संघटना यांची बैठक घेवून रिक्षा चालक व मालक यांच्या अडी अडचणी समाजवून घेण्यात आल्या.

सदर बैठकीमध्ये मुंढवा पोलीस ठाणे पोलीस उप निरीक्षक कांबळे यांनी बैठकीस उपस्थित पदाधिकारी व नागरीकांना मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सुरू केलेल्या भरोसा सेल, पोलीस काका, बडीकॉप, जेष्ठ नागरीक व महिला, बालक यांची सुरक्षा अशा व इतर विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. तसेच थर्ड आय या संकल्पनेच्या अनुषंगाने सोसायटी, दुकाने या ठिकाणी वाढत्या चोरीचे अनुषंगाने सुरक्षेबाबत उपाययोजना म्हणून महत्वाचे चौक, गर्दीची ठिकाणे या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. बसविण्यात आले असल्याचे व रिक्षा चालक, मालक यांनी देखील दक्षतेच्या अनुषंगाने कोणी संशयीत मिळून आलेस तात्काळ पोलीसांशी संपर्क साधने, वाहतुकीचे नियम पाळणे, जेष्ठ नागरीकांशी सौजन्याने वागणे, लहान मुले, महिला व मुले यांचे भाडयास प्रथम प्राधान्य देणे, काही गहाळ वस्तु मिळून आलेस व संशयीत वाटलेस तात्काळ मुंढवा पोलीस ठाणे फोन नं. ०२०-२-७०७१८१ या क्रमाकांवर संपर्क साधने अशा विविध बाबींवर मार्गदर्शन केले.

तसेच कोणी दादागिरी/भाईगीरी करीत असल्याचे निदर्शनास आल्यावर त्यांचेवर कडक व प्रभावी कारवाई करण्यात येईल याबाबतही सुचना देण्यात आले असता रिक्षा चालक /मालक यांचेकडून पोलीसांनी दिलेल्या सुचना प्रमाणे काटेकोरपणे पालन करणार असल्याचे आश्वासन देण्यात आल.